**<u>प्रेसनोट दि.०३/०३/२०१९</u>**

**<u>बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर</u>**

**<u>हरविलेल्या अल्पवयीन मुलाचे पालकांचा शोध घेवून, अल्पवयीन मुलास त्याचे आईचे ताब्यात दिले.</u>**

दिनांक २५/०२/२०१९ रोजी सायंकाळी ६.०० वा.चे सुमारास पुणे स्टेशन मार्शलचे पोलीस कर्मचारी गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना अंदाजे ७ वर्षे वयाचा अल्पवयीन मुलगा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाजवळ मिळून आला. तो कावराबावरा झालेला होता. मार्शलचे पोलीसांनी त्यास ताब्यात घेवून आस्थेवाईकपणे विचारपूस केली असता त्याने त्याचे नांवर राहुल राजु चव्हाण असल्याचे सांगुन कोरेगाव जेजुरी येथील राहणारा आहे. आईसोबत आलो असुन रस्ता चुकलेलो आहे, असे सांगितले. मार्शलचे पोलीस सदर मुलास घेवून पुणे स्टेशन परिसरात फिरले त्यांना कोणी मिळून आले नाही. त्यानंतर पोलीस रेल्वे स्टेशन परिसरात मुलास घेवून फिरत असताना, फ्लॅट फॉर्म् नं.१ वर पोलीसांना, अल्पवयीन मुलाने त्याची आई दाखविली. पोलीसांनी जवळ जावून त्याचे आईस पोलीस चौकी येथे घेवून आले व चौकशी केली असता, त्यांनी त्यांचे नांव लक्ष्मी राजु चव्हाण वय .३० रा. कोरेगांव जेजुरी ता. पुरंधर जि. पुणे सांगितले. पुण्यात ससुन हॉस्पीटल येथे रेल्वेने आले होते. मुलाची व माझी चुकामुक झाली मुलगा रेल्वे स्टेशनकडे आला असेल म्हणून मी रेल्वे स्टेशनवर आले असे सांगितले.

सदर मुलास त्याचे आईचे ताब्यात दिला. सदर महिलेने पोलीसांचे आभार मानले.

सदरची चांगली कामगिरी बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील पोलीस कर्मचारी अविनाश गोसावी व कांबळे यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे**